पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड शहर टंचाई अंतर्गत उपाययोजनांच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ९१ /पापु १४
जी. टी. रुग्णालय इमारत संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १४ मे, २०१८

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.०८.२००९
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६
३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे क्रमांक २०१८/नपप्र/आस्था-२/कावि-६८/ दिनांक २५.४.२०१८ चे पत्र
४) शासन पत्र क्रमांक : बैठक २०१७/प्र.क्र.१७०/पापु-१४, दिनांक ०५ मे, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना -</u>

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक **२५**.०४.२०१८ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत सिल्लोड शहर, जिल्हा औरंगाबाद येथील टंचाई अंतर्गत उपाययोजनांच्या रुपये **७३.१५** लाख इतक्या किंमतीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव सचिव स्तरीय स्थायी समितीच्या दिनांक **०३** मे, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला होता.

सिल्लोड शहरासाठी पाणी पुरवठा योजनेचा उद्भव असलेला खेळणा प्रकल्प क्षेत्रात चर खोदणे तसेच प्रकल्प क्षेत्रात असलेल्या विहिरीवरुन पी.व्ही.सी. पाईप व पंपींग मशिनरी बाबतच्या प्रस्तावास अपर मुख्य सचिव यांच्या अध्यखतेखालील सचिव स्तरीय स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार खेळणा प्रकल्प क्षेत्रात चर खोदणे एकूण किंमत रु. ३३.७० लाख आणि प्रकल्प क्षेत्रातील विहिरीवर पी.व्ही.सी. पाईपलाईन करणे बाबत रु. २०.६५ लाख अशा एकूण रु. ५४.३५ लाख इतक्या किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सिल्लोड शहर, जिल्हा औरंगाबाद येथील पाणी **टंचाई अंतर्गत उपाययोजनांच्या** प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा समावेश असलेल्या रु. ५४.३५ लाख (रुपये चौपन्न लाख, पस्तीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सिल्लोड शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर योजनेची अंमलबजावणी नगरपरिषद, सिल्लोड यांनी करावी.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५) निविदा प्रक्रीया दिनांक १९ मे, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया या दिनांका पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

६) योजनेची कामे दि. २५ मे, २०१८ पर्यंत पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे.

७) सदर योजनेच्या एकूण रुपये ५४.३५ **लाख** खर्चाच्या ९० % म्हणजेच रुपये ४८.९२ इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १० % (**सिल्लोड 'ब 'नगरपरिषद असल्याने**) रक्कम रुपये ५.४३ **लाख** लोकवर्गणी म्हणून नगर परिषद, सिल्लोड यांनी भरावयाची आहे. ही लोकवर्गणी जमा केल्यानंतरच योजनेच्या कामास सुरुवात करण्यात यावी.

८) सदर प्रस्तावात नमूद केलेली सर्व कामे नगर परिषद, सिल्लोड यांचेमार्फत करणे आवश्यक राहील.

९) योजनेची कामे मंजूर/मान्यता प्राप्त किंमतीमध्येच तातडीने पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. योजनेची किंमत वाढल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१०) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस ५०% इतका निधी द्यावा व उर्वरित ५०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतरच देण्यात यावा.

११) कोणत्याही कारणाने योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास त्याकरिता शासनाकडून वाढीव अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१२) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना/ उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०३ मे, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१४१३०२२७४७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.05.14 16:27:00 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
९. जिल्हाधिकारी, औरंगाबाद
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

१२. मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड , जि. औरंगाबाद
१३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१४. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५. पापु १४ (निवडनस्ती)